# अण्णासाहेब मगर महाविद्यालयाला 'क्विक हील फाउंडेशन'चा राज्यस्तरीय मानाचा पुरस्कार




**हडपसर (प्रतिनिधी)**

सायबर साक्षरतेच्या क्षेत्रात महत्त्वपूर्ण कार्य करणाऱ्या 'क्विक हील फाउंडेशन'च्या वतीने आयोजित 'सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा' या उपक्रमात पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या हडपसर येथील अण्णासाहेब मगर महाविद्यालयाने राज्यस्तरावर उल्लेखनीय यश संपादन केले आहे. या उपक्रमाअंतर्गत महाविद्यालयाला 'नवीन क्लब उपविजेता' हा राज्यस्तरीय मानाचा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

महाराष्ट्र सायबर पोलीस दलाचे उपमहानिरीक्षक (डीआयजी) संजय शिंत्रे यांच्या प्रमुख उपस्थितीत हा पुरस्कार सोहळा संपन्न झाला. 'क्विक हील'चे संस्थापक डॉ. कैलास काटकर (अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक), डॉ. संजय काटकर (संयुक्त व्यवस्थापकीय संचालक) तसेच फाउंडेशनच्या अध्यक्षा अनुपमा काटकर यांच्या संकल्पनेतून ही मोहिम राबविण्यात आली.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. नितीन घोरपडे यांना त्यांच्या उत्कृष्ट नेतृत्वाबद्दल 'सर्वोत्कृष्ट प्राचार्य उपविजेता' हा विशेष बहुमान प्रदान करण्यात आला. या यशस्वी मोहिमच्या अंमलबजावणीत उपप्राचार्य डॉ. मुळे, उपप्राचार्या डॉ. शुभांगी औटी, विभागप्रमुख डॉ. वाणी यांचे मोलाचे सहकार्य लाभले, तर प्राध्यापिका मनीषा गाडेकर यांनी या उपक्रमासाठी विशेष परिश्रम घेतले.

यावेळी महाविद्यालयाच्या सायबर क्लबमधील पदाधिकारी व सदस्यांच्या कार्याचेही विशेष कौतुक करण्यात आले. नामनिर्देशित अध्यक्ष तेजस दळवी, कार्यक्रम संचालक अवधूत मोरे, माध्यम संचालक अश्लेषा डमगुडे, सचिव यश भराटे तसेच योद्धे सदस्य अहान दगडे आणि पायल पठारे यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला. समाजातील डिजिटल धोके ओळखून सायबर सुरक्षेबाबत जनजागृती करणाऱ्या या विद्यार्थ्यांना 'सर्वोत्कृष्ट योद्धा पुरस्कार' देऊन सन्मानित करण्यात आले.

पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या (पीडीईए) या महाविद्यालयातील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि सदस्यांनी दिलेल्या योगदानाबद्दलही मान्यवरांच्या हस्ते सर्वांचे विशेष अभिनंदन करण्यात आले. या यशामुळे महाविद्यालयाच्या सायबर साक्षरता मोहिमेला राज्यस्तरावर विशेष ओळख मिळाली आहे.

